# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि संशोधन केंद्र, अंजनगाव रोड, अचलपुर

दुरध्वनी[कार्यालय]-०७२२३/२२०११
ईमेल:arsachalpur@pdkv.ac.in
arsachalpur@gmail.com


जा.क्र. कृसंके/अचल./उद्यानविद्या/५९१/२०२६
कृषि संशोधन केंद्र, अचलपूर
सहयोगी प्राध्यापक (कृषिविद्या) यांचे कार्यालय
दिनांक- ०९/ ०१ /२०२६

## दरपत्रक/निविदा

प्रति,

.............................................
.............................................
.............................................

**विषय - गाळाची माती (भसवा माती) पुरवठा करणेबाबत........**

वरील विषयाच्या अनुषंगाने या विभागास गाळाची मातीची आवश्यकता आहे. तरी इच्छुक पुरवठादारांनी कृपया सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून खालील प्रपत्रात दर्शविल्यानुसार दरपत्रक या कार्यालयास विहित मुदतीत सादर करावेत.

| अ.क्र. | निविष्ठा/वस्तू विवरण | दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | गाळाची माती (भसवा माती) | प्रती ब्रास प्रमाणे | पुरवठा करण्यात येणारे वाहनाचे नांव, क्रमांक व त्याचे मापे उपलब्ध असल्यास देण्यात यावे. |

टिप - सर्व दर दरपत्रके दि. १९/०१/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० पर्यत या कार्यालयात सादर करावी. सर्व दर पत्रके हे प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, अचलपूर यांच्या नावे खालील कार्यालयीन पत्त्यावर विहित मुदतीच्या आत पोहचतील असे पाठवावे.

<u>दर पत्रकाविषयी नियम व अटी व शर्ती</u>

१. दर पत्रके मोहरबंद लिफाफ्या मध्ये सोबत दिलेल्या प्रपत्रा नुसार सादर करावीत.

२. लिफाफ्याच्या डाव्या बाजुस स्पष्ट अक्षरात **'गाळाची मातीचा पुरवठा करणेबाबतची निविदा'** असे नमुद करावे तसेच दर पत्रकामध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्र क. कृसंके/अचल./उद्यानविद्या/ /२०२६ व दि.०९/०१/२०२६ नमुद करावे.

३. देयक सादर करतांना जी.एस.टी. संबंधी शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटी व शर्ती ची पूर्तता करण्याची जबाबदारी हि पुरवठादाराची असेल.

४. पुरवठा करण्यात आलेली गाळाची माती हे योग्य दर्जाचे नसल्यास देयकाचे शोधन केले जाणार नाही व पुरवठादारास स्वत: उचलून न्यावे लागेल.

५. रॉयल्टी ई. संबधित तसेच शासकीय लागणा—या सर्व परवानग्या (उचल, वाहतूक इ.) सर्व नियमाची जबाबदारी हि पुरवठादाराची असेल.

६. समान दरपत्रके व दर आढळून आल्यास या पूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व याबाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.

७. पुरवठा आदेश दिल्यानंतर दिलेल्या नमुद कालावधीत मातीचा पुरवठा करावा लागेल, न केल्यास आपोआप पुरवठा आदेश रदद समजण्यात येईल या बददल कुठेही दाद मागता येणार नाही. त्यानंतर पुढील पुरवठा धारकास माती पुरविण्याचे आदेश देण्यात येईल.

८. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशत: स्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रके नाकारणे यांचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समितीचे यांचे असतील.

९. संबंधित पुरवठादाराने साहित्याचे दर हे किती दिवसां करिता वैध आहेत हे दर पत्रकात स्पष्ट नमुद करावे.

१०. दर पत्रके मंजुर करणे अथवा सदर करार रद्द करणे या बाबतचे सर्व हक्क निम्नस्वाक्षरी कर्ताकडे राखून ठेवले आहेत.

११. या दरप्रक्रिये अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अचलपूर न्यायालयात चालेल.

१२. संबंधित ठेकेदारांनी वरील नियम व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सही, नाव व पूर्ण पत्त्यासह व मोबाईल क्र. सह दर पत्रक सोबत सादर करावेत.

१३. किंतु—परंतु तसेच अटी व शर्तीचे दरपत्रके नाकारण्यात येईल.

१४. कोणतेही कायदेशिर बाब अचलपूर न्यायालयातंर्गत राहील.

**प्रभारी अधिकारी**
**कृषि संशोधन केंद्र, अचलपूर**

**प्रतिलिपी**

१. मा. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहिती तथा उपरोक्त दरपत्रक/निविदा जाहिरातीचे प्रारुप विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे हि विनंती.

२. कृषि संशोधन केंद्र, अचलपूरच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर